पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई

■ वर्ष १ ■ अंक २३ ■ शुक्रवार दि. २६ जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.-MHAR/26/A4530 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# विशिष्ट घनकचरा ठेकेदाराच्या नियुक्तीसाठी खटाटोप...

## विरोधी पक्ष नेता डॉ.जीशान हुसेन यांची मागणी, मांडले विविध मुद्दे

प्रतिनिधी २६ जून

**अकोला :** अकोला महानगरपालिकेने घराघरातून घनकचरा संकलन व वाहतूक करण्यासाठी काढलेल्या निविदा प्रक्रियेवर काँग्रेसचे नगरसेवक व विरोधी पक्षनेते डॉ. जीशान हुसेन यांनी गंभीर आक्षेप घेत निविदा प्रक्रिया तात्काळ स्थगित करण्याची मागणी केली आहे. याबाबत त्यांनी महापालिका आयुक्तांना सविस्तर निवेदन सादर केले आहे. विशिष्ट ठेकेदाराच्या नियुक्तीसाठी महापालिका प्रयत्नशील असल्याचा गंभीर आरोप विरोधी पक्षनेता व काँग्रेस गटनेता डॉ.जीशान हुसेन यांनी केला आहे.

महापालिका आयुक्त यांना दिलेल्या निवेदनात नमूद केल्यानुसार, ८ जून २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेमध्ये अनेक कायदेशीर त्रुटी, स्पर्धा मर्यादित करणाऱ्या अटी, प्रकल्प खर्चाची माहिती लपविणे तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ चे पालन न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. डॉ. जीशान हुसेन यांनी दावा केला आहे की निविदेतील काही पात्रता अटी विशिष्ट कंपनीला लाभ मिळावा यासाठी तयार करण्यात आल्या आहेत. निविदेत २०२४ नंतर



नोंदणीकृत २५० हायड्रॉलिक वाहने, १२५ कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल आणि एका महानगरपालिकेत १ लाख घरांचे कामकाजाचा अनुभव अशा अटी घालण्यात आल्या असून त्यामुळे इतर पात्र कंपन्यांना स्पर्धेतून बाहेर ठेवण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.तसेच, निविदेमध्ये प्रकल्पाची अंदाजित किंमत जाहीर करण्यात आलेली नसल्याने पारदर्शकतेचा अभाव असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. सुमारे २६० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या प्रकल्पाची माहिती नागरिकांपासून लपविण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

निवेदनात घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ लागू झाल्यानंतरही निविदेमध्ये जुन्या २०१६ च्या नियमांचा संदर्भ देण्यात आल्यामुळे कायदेशीर संभ्रम निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच कंत्राटदारांना देयके उशिरा दिल्यास महापालिकेवर कोणताही दंड नसताना कामगारांचे वेतन वेळेवर न दिल्यास कंत्राटदारावर कारवाईची तरतूद असल्याने आर्थिक भार अखेरीस नागरिकांवर पडणार असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे.

डॉ. जीशान हुसेन यांनी या संपूर्ण निविदा प्रक्रियेची चौकशी करून संबंधित कागदपत्रे, फाईल नोटिंग, बैठकींचे इतिवृत्त आणि निविदा मसुदा तयार करण्यामागील प्रक्रिया सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे. तसेच ३० जून रोजी होणारी निविदा प्रक्रिया तात्काळ स्थगित करून सर्व आक्षेपांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, या आरोपांमुळे अकोला महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेबाबत नवा वाद निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सिटी न्यूज च्या बातमीचा दणका, भूमी अभिलेख विभागात...

# त्या संशयित ज्युनिअर अधिकाऱ्यांच्या मुदतपूर्व बदल्या !

## कारवाई की 'सेफ पॅसेज'?, भ्रष्टाचाराची चौकशी दडपण्याचा खटाटोप ?

प्रतिनिधी २६ जून

**अकोला :** अकोल्याच्या भूमी अभिलेख विभागातील गंभीर अनागोंदी कारभारावर आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणावर 'सिटी न्यूज सुपरफास्ट' ने प्रकाश टाकताच प्रशासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. या बातमीचा मोठा इम्पॅक्ट पाहायला मिळाला असून, विभागाने तडकाफडकी ४ ज्युनिअर अधिकाऱ्यांच्या मुदतपूर्व बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. मात्र, उपअधीक्षक पंकज पवार यांच्या निलंबनानंतर या कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई होणे अपेक्षित असताना, केवळ त्यांच्या बदल्या करून मूळ प्रकरणावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न तर होत नाही ना ? अशी शंका आता उपस्थित केली जात आहे. विधी मंडळ सुरु असताना विभागाने घाईघाईने जारी केलेल्या आदेशानुसार खालील कर्मचाऱ्यांना तातडीने अकोल्याबाहेर हलवण्यात आले आहे. भूमापक कुणाल राजपूत यांची वरुड येथे, परिरक्षण भूमापक राजेश शेगोकार यांची लोणार येथे, तर परिरक्षण भूमापक सचिन कोलते यांची धारणी येथे बदली झाली. भूमापक गजेंद्र चव्हाण यांची मुदतपूर्व बदली संग्रामपूर येथे करण्यात आली. भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक पंकज पवार यांच्यावर गंभीर आर्थिक अनियमितता आणि भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली निलंबनाची कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक माहितीनुसार, या संपूर्ण गैरव्यवहारात आणि संशयास्पद फाईल्स मंजूर करण्यात बदली झालेल्या काही कनिष्ठ अधिकाऱ्यांनी (ज्युनिअर ऑफिसर्स) त्यांना पडद्यामागून मोठी मदत केल्याचे संकेत मिळत होते. कायद्यानुसार, मुख्य आरोपी निलंबित झाल्यावर या संपूर्ण 'सिंडिकेट'वर विभागीय चौकशी बसवून पोलिसांच्या हवाली करणे गरजेचे होते. परंतु, कडक कारवाई करण्याऐवजी प्रशासनाने या चारही अधिकाऱ्यांना वेगवेगळ्या तालुक्यांत आणि जिल्ह्यांत विखुरले आहे.

RRC News सिटी न्यूज सुपरफास्ट IMPACT

### प्रशासकीय अनागोंदी दाबण्याचा प्रयत्न ?

गुन्हा दाखल झालेल्या उपअधीक्षकांच्या निकटवर्तीयांना थेट 'सेफ पॅसेज' देण्यासाठीच तर या बदल्या करण्यात आलेल्या नाहीत ना ? आरोपींना अकोल्यापासून दूर केल्यामुळे मुख्य चौकशी विस्कळीत होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. 'सिटी न्यूज सुपरफास्ट' च्या दणक्यामुळे प्रशासनाला या बदल्या करणे तर भाग पडले, परंतु ही केवळ वरवरची मलमपट्टी असून या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी आता अकोलेकरांमधून जोर धरू लागली आहे.

### पवार यांच्यावर झालेले आरोप

उप अधीक्षक पंकज पवार यांच्या विरोधात दाखल एफ आय आर मध्ये शासनाचा विश्वासघात करून खाजगी व्यक्तींच्या फायद्यासाठी अनेक बेकायदेशीर कृत्ये केल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे.तब्बल १५ प्रकरणांमध्ये मालमत्तेचे अधिकार, सत्ता प्रकार बदलणे आणि मयत खातेदारांच्या नावे नियमबाह्य पद्धतीने अर्ज मंजूर करणे. ७ प्रकरणांमध्ये तात्पुरत्या भाडेपट्ट्याच्या मिळकत पत्रिका तयार करणे, तसेच केवळ जागेची पाहणी करून नवीन मिळकत पत्रिका नियमबाह्यपणे बनविले होते.खाजगी व्यक्तींच्या फायद्यासाठी मालमत्तेचे क्षेत्र वाढवणे, सार्वजनिक सुविधांच्या जागांवर खाजगी व्यक्तींची नावे नोंदवणे आणि जमिनींचे एकत्रिकरण (सामिलीकरण) करताना क्षेत्रफळ वाढवण्याचा उद्योग केला. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ चे उल्लंघन करून अधिकाराबाहेर जाऊन आदेश देणे आणि प्रमाणपत्रे वाटणे. अकोला महानगरपालिकेकडे भूसंपादनाद्वारे हस्तांतरित झालेल्या शासकीय जागेवर खाजगी व्यक्तींची नावे बेकायदेशीरपणे चढवणे. असा आरोप गुन्हा दाखल करताना विभागाने पंकज पवार यांच्यावर केला होता. तर या सर्व प्रकरणात ज्युनिअर ऑफिसरची भूमिका काय होती. त्याच्या केवळ बदल्या करण्याने हे प्रकरण मिटविण्याचे प्रयत्न सुरु आहे.

# कृषी विद्यापीठाच्या अमरावती येथील संशोधन जमिनीवर डल्ला ?

प्रतिनिधी २६ जून

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची अमरावती येथील अत्यंत मौल्यवान आणि संशोधनाच्या कामासाठी राखीव असलेली तब्बल ७ हेक्टर जमीन कृषी विभागाला विनामूल्य हस्तांतरित करण्यासाठी पडद्यामागे जोरदार हालचाली सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विद्यापीठाच्या कुलसचिव या ही जमीन देण्यासाठी अत्यंत घाईघाईने प्रयत्नशील असून, कार्यकारी परिषदेची दिशाभूल करून हा ठराव मंजुरीसाठी ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप आता होऊ लागला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती येथील तपोवन रोडवर असलेल्या कृषी संकुलातील गट क्र. ४ मधील ७ हेक्टर जमीन कृषी विभागाच्या नावे हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

मात्र, इतकी मोठी आणि संशोधनासाठी महत्त्वाची असलेली जमीन हस्तांतरित करताना विद्यापीठ स्तरावर कोणतीही सखोल शहानिशा करण्यात आलेली नाही.

विद्यापीठाच्या हिताचा विचार न करता, कुलसचिवांनी थेट कार्यकारी परिषदेसमोर हा ठराव मंजुरीसाठी आणल्याने आश्चर्य आणि संताप व्यक्त केला जात आहे.या संपूर्ण जमीन हस्तांतरणाच्या प्रक्रियेला कायदेशीर कव्हर देण्यासाठी अमरावती येथील प्रादेशिक संशोधन केंद्राचे प्रमुख तथा शास्त्रज्ञ यांच्याकडून तातडीने एक पत्र मागवून घेण्यात आल्याचे उघड झाले आहे.या प्रकरणी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेतील इतर सदस्य आता काय भूमिका घेतात आणि या कथित जमीन वाटपाची उच्चस्तरीय चौकशी होणार का, याकडे संपूर्ण कृषी वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### घाईघाईने दिलेला अभिप्राय

विशेष म्हणजे, विभागीय कृषी सहसंचालकांचे पत्र १८ जूनला येते आणि त्याच दिवशी (१८ जून रोजीच) अमरावती संशोधन केंद्राकडून 'सदर जमीन हस्तांतरित करण्यास काही हरकत नसावी' असा घाईघाईचा अभिप्राय देऊन टाकला जातो. एकाच दिवसात झालेल्या या चक्राकार पत्रव्यवहारामुळे आणि वरिष्ठ पातळीवरून दबाव आणून हे 'नियमबाह्य' पत्र तयार करून घेतल्याच्या आरोपाला बळकटी मिळत आहे.

### संशोधनाची जमीन विनामूल्य देण्याचा अट्टाहास का?

सदर जमीन ही मूळची डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या मालकीची (कुलसचिवांच्या नावे) असून ती विद्यार्थ्यांच्या आणि शास्त्रज्ञांच्या संशोधनासाठी अत्यंत आवश्यक आहे. असे असतानाही, विद्यापीठाचे नुकसान करून ही कोट्यवधी रुपयांची जमीन कृषी विभागाला विनामूल्य का दिली जात आहे? यासाठी कोणाचा राजकीय किंवा प्रशासकीय दबाव आहे का? असे अनेक गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

# आषाढी वारीसाठी २१ व २३ जुलैला खामगावहून पंढरपूरसाठी विशेष रेल्वे

प्रतिनिधी २६ जून

**खामगाव:** आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन मध्य रेल्वे प्रशासनाने खामगाव पंढरपूर विशेष रेल्वेगाडी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. जुलै महिन्यात या विशेष रेल्वेच्या एकूण चार फेऱ्या होणार असून, खामगाव, शेगाव, नांदुरा, संग्रामपूर, जळगाव जामोद, मलकापूरसह परिसरातील वारकऱ्यांना पंढरपूरला जाण्यासाठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

रेल्वे प्रशासनाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, गाडी क्रमांक ०११२१ ही विशेष रेल्वे २१ जुलै व २३ जुलै रोजी खामगाव येथून सकाळी ११:३० वाजता सुटेल. ही गाडी विविध स्थानकांवर थांबे घेत दुसऱ्या दिवशी पहाटे ३:३० वाजता पंढरपूर येथे पोहोचेल. तसेच गाडी क्रमांक ०११२२ ही विशेष रेल्वे २२ जुलै व २४ जुलै रोजी पंढरपूर येथून सकाळी ५:०० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी सायंकाळी ७:३० वाजता खामगाव येथे दाखल होईल.

## ◆ जिल्ह्यातील वारकऱ्यांसह प्रवाशांना मोठा दिलासा

**उत्तर महाराष्ट्र, मराठवाड्यातील प्रवाशांनाही सेवेचा लाभ!**

या विशेष रेल्वेला जलंब, नांदुरा, मलकापूर, बोदवड, भुसावळ, जळगाव, पाचोरा, चाळीसगाव, नांदगाव, मनमाड, कोपरगाव, बेलापूर, अहिल्यानगर, दौंड आणि कुर्दुवाडी या महत्त्वाच्या स्थानकांत थांबे देण्यात आले आहेत. त्यामुळे केवळ बुलढाणा जिल्ह्यातीलच नव्हे, तर उत्तर महाराष्ट्र व मराठवाड्यातील प्रवाशांनाही या सेवेचा लाभ मिळणार आहे.



**अशी आहे रेल्वेची रचना**

रेल्वेची रचना प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन करण्यात आली आहे. या विशेष रेल्वेत २ वातानुकूलित तृतीय श्रेणी डबे, १० शयनयान डबे, ४ सामान्य द्वितीय श्रेणी डबे तसेच २ सामान-सह-गार्ड ब्रेकव्हॅन असतील. त्यामुळे विविध आर्थिक स्तरातील प्रवाशांना त्यांच्या गरजेनुसार प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

**प्रवाशांसाठी सुलभ**

खामगाव रेल्वे स्थानकातून पंढरपूरसाठी थेट विशेष रेल्वे उपलब्ध होत असल्याने वारकऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे. दरवर्षी आषाढी वारीच्या काळात हजारो भाविक पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या काळात बस आणि खासगी वाहनांवर मोठा ताण येतो.

# आता सखोल चौकशी, जबाबदारी निश्चितीची वेळ आली आहे- खा. संजय राऊत

प्रतिनिधी २६ जून



**मुंबई :** 'अयोध्या येथील राम मंदिराच्या उभारणीसाठी शिवसेनेने दान केलेली ४ किलो वजनाची चांदीची वीट बेपत्ता झाल्यामुळे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. उद्धव ठाकरे यांनी हजारो शिवसैनिक आणि साधू-संतांच्या उपस्थितीत १ कोटी रुपये आणि ही पवित्र चांदीची वीट सढळ हाताने दान केली होती. तरीही, इतकी वर्षे उलटूनही ट्रस्टकडून त्याबाबत कोणतीही पावती किंवा माहिती मिळालेली नाही. ती वीट नक्की कुठे गेली? आता सखोल चौकशी आणि जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आली आहे!' असे म्हणत खासदार संजय राऊत यांनी मंदिराच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

अयोध्या राम मंदिरातील दानातील चोरी प्रकरणात कायदेशीर कारवाई सुरू झाली आहे. एसआयटीचा प्राथमिक तपास अहवाल मिळाल्यानंतर, रामजन्मभूमी पोलीस ठाण्यात आठ आरोपींविरुद्ध नावे नमूद करून एफआयआर दाखल करण्यात आला आहे. अयोध्यातील श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने एफआयआर दाखल केल्यानंतर, आठ जणांना आरोपी बनवण्यात आलंय. ट्रस्टचे सदस्य कृष्ण मोहन यांनी एसआयटीच्या प्राथमिक अहवालाच्या आधारे ही तक्रार केली.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी त्वरित पावले उचलत ७ प्रमुख आरोपींना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. तर अनुकल्प मिश्रा नावाच्या एका मुख्य आरोपीकडून कथित रक्कमेची वसुली झाल्यानंतर त्याला रीतसर अटक करण्यात आली आहे. दुसरीकडे याच मुद्यावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी निशाना साधत काही गंभीर आरोप केले आहे.

राम जन्मभूमी ट्रस्टचे सदस्य श्रीकृष्ण मोहन यांच्या तक्रारीच्या आधारे, राम मंदिरातील दानाच्या चोरीप्रकरणी टिन्नू यादव, अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा, अविनाश शुक्ला, सुभाष चंद्र शुक्ला, करुणेश पांडे, मनीष यादव आणि रामशंकर मिश्रा यांच्या विरोधात नावे नमूद करून एफआयआर दाखल करण्यात आला आहे. त्यांच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०६, ३१६, ३१७, ३१७(४), ३१७(५), ६१, ३(५) आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीसी कायदा) आरोप ठेवण्यात आले आहेत. दरम्यान, देणगी चोरी प्रकरणी आठ जणांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे. यापैकी बहुतेक जण देणग्या मोजणे आणि आर्थिक व्यवहार सांभाळण्याच्या कामात गुंतलेले आहेत.

# नितीन सावंत यांचे शनिवारी बुलढाण्यात व्याख्यान

**बुलढाणा :** महात्मा ज्योतिराव फुले व राजर्षी शाहू महाराज या दोन्ही युगपुरुषांनी समाजाला दिशा देण्याचे कार्य केले. त्यांचे विचार घेऊन सदोदित वेगळा विचार देणाऱ्या मराठा सेवा संघाने यावर्षी फुले जन्मशताब्दी वर्ष व राजर्षी शाहू महाराज जयंतीच्या पर्वावर बुलढाण्यात शनिवार २७ जून पुरोगामी विचाराचे गाढे अभ्यासक शिवश्री नितीन सावंत यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजिनीयर रविकांत काळवाघे जिल्हाध्यक्ष मराठा सेवा संघ आहे. तर दलितमित्र माधवराव हुडेकर, शिक्षणाधिकारी अनिल आकाळ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. २७ जून रोजी सकाळी ११ वाजता शरद कला महाविद्यालय, हाजी मलंग दर्याच्या पाठीमागे, चिखली रोड बुलढाणा येथे शिव-फुले-शाहू-आंबेडकर यांचे विचार व आजचे वास्तव या विषयावर नितीन सावंत मार्गदर्शन करणार आहेत.

# ५४.२ ग्रॅम मॅफेड्रान ड्रग्ससह आरोपी ताब्यात

प्रतिनिधी २६ जून

**अमरावती:** नागपूरीगेट हद्दीतून ५४.२ ग्रॅम मॅफेड्रान ड्रग्स (एम.डी.) किंमत ८ लाख १५ हजारांचे मुद्देमालासह आरोपीस ताब्यात घेतले आहे.

गुन्हे शाखा युनिट क्रमांक ०१, अमरावती शहर येथील अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदारा कडून गोपनिय माहिती प्राप्त झाली की, रेकॉर्ड वरील एक गुन्हेगार हबीब नगर, नं. ०१, अमरावती येथे त्याचे राहते घरात मेफेड्रान (एम.डी.) नावाचा अंमलीपदार्थ बाळगून विक्री करीत आहे. अशा गोपनिय व खात्रीशीर माहितीवरुन दिनांक २६/०६/२०२६ रोजी गुन्हेशाखा, अमरावती शहरचे अधिकारी व अंमलदार यांनी पो.स्टे. नागपूरीगेट हद्दीत हबीब नगर, नं. १, अमरावती येथे अब्दुल इजाज उर्फ इनान चन्द्रपूर यांचे राहते घरी छापेमारी केली असता घरझडतीमध्ये ५४.२ ग्रॅम मेफेड्रान (एम.डी.) नावाचा अंमलीपदार्थ मिळून आला. सदर अंमलीपदार्थ हा विक्रीकरीता बाळगत असल्याची



कबुली दिली.आरोपी विरुध्द पो.स्टे. नागपूरीगेट येथे गुन्हा नोंद करणे सुरु आहे. अब्दुल इजान अब्दुल अजीम उर्फ इजाज चन्द्रपूरी, वय ५५ वर्षे, रा. हबीब नगर, नं. ०१, अमरावती असे आरोपीचे नाव असून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल -

५४.२ ग्रॅम मेफेड्रान ड्रग्स (एम.डी.) किं. ८,१३,०००/-रु. ईलेक्ट्रानिक्स वनज काटा किं. २,०००/-रु. असा एकूण ८,१५,०००/-रु. चा मुद्देमाल आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त, राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके सा. (परिमंडळ- १, रमेश धुमाळ, पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय), सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे विभाग) श्र शिवाजी बचाटे, तसेच सहायक पोलीस आयुक्त, (गाडगेनगर विभाग) कैलाश फुंडकर यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. दिनेश दहातोंडे, पो.नि. अतुल वर, सपोनि मनीष वाकोडे, सपोनि दशरथ आडे, सपोनि महेश इंगोले, पो. उपनि. गजानन सोनुने, सहा. पोउपनि फिरोज खान, पोहवा सतिष देशमुख, पोहवा मंगेश लोखंडे, पो.हे.कॉ. नाझीमउददीन सैयद, पो.ना. सचिन भोयर, पोलीस अमलदार रंजित गावंडे, सुरज चव्हाण, निखील गेडाम, सागर ठाकरे, नरेश मोहरिल, म.पो. शी. वर्षा घोंगडे, चालक चेतन शर्मा, पो.हे. कॉ. सुधिर गुढधे गुन्हे शाखा, अमरावती शहर यांनी केलेली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शुक्रवार दि. २६ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# भूमि अभिलेख विभागाचा सुधारित आकृतीबंध जाहीर

प्रतिनिधी २६ जून

**अकोला :** महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख विभागातील पदांच्या सुधारीत आकृतीबंधानुसार आता जिल्हा पातळीवर पदांचे नवीन वाटप निश्चित करण्यात आले आहे. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे कार्यालयाकडून या नवीन रचनेनुसार अकोला जिल्ह्यातील नगर भूमापन अधिकारी कार्यालय आणि विविध तालुक्यांतील उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयांची सुधारित पदसंख्या आणि संरचना आता स्पष्ट झाली आहे.

नगर भूमापन अधिकारी कार्यालय, अकोला (न.भू.अ. अकोला)अकोला शहरातील नागरीकरणाचा वेग आणि कामाचे स्वरूप विचारात घेऊन सुधारित आकृतीबंधानुसार नगर भूमापन अधिकारी (अकोला) कार्यालयाची एकूण १७ पदांची आस्थापना निश्चित करण्यात आली आहे. नगर भूमापन अधिकारी: १

**◆ नगर भूमापन आणि उपअधीक्षक कार्यालयातील पदांचे अंतिम वाटप**

पद (नियमित) शिरस्तेदार: २ पदे (नियमित) परिरक्षण भूमापक : ८ पदे (नियमित) भूकरमापक: २ पदे(नियमित) शिपाई: ४ पदे मंजुर करण्यात आली.

अकोला जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या उपअधीक्षक कार्यालयांचाही आढावा घेऊन तेथील कामाच्या प्रमाणानुसार एकूण पदांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. स्वामित्व प्रकल्पामुळे वाढलेल्या मिळकती आणि नागरी भागातील वाढते कामकाज पाहता, प्रत्येक उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयात १ परिरक्षण भूमापकाचे नवीन पद मंजूर करण्यात आले आहे. याशिवाय जुन्या आकृतीबंधातील दुरुस्ती लिपिक, आवक-जावक लिपिक यांची कामे आता परिरक्षण भूमापक व भूकरमापकांकडे सोपवून कार्यालयांचे सक्षमीकरण करण्यात आले आह

अकोला येथे 'विशेष उपअधीक्षक' कार्यालयाचे मुख्यालयात गावठाण आणि शहर मापन कामांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शासनाने स्वतंत्र निर्णय घेतला आहे. यानुसार विशेष उपअधीक्षक भूमि अभिलेख (न.भू./गावठाण/चौकशी अधिकारी), अकोला हे नवीन मुख्यालय निश्चित करण्यात आले आहे. या कार्यालयाचे कार्यक्षेत्र अकोला व वाशीम या दोन्ही जिल्ह्यांसाठी एकत्रित असणार आहे. या विशेष कार्यालयामध्ये एकूण १२ पदांची आस्थापना असेल, ज्यामध्ये १ विशेष उपअधीक्षक, १ शिरस्तेदार, १ परिरक्षण भूमापक, ६ भूकरमापक आणि ३ शिपाई पदांचा समावेश आहे. जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल (भा.प्र.से.) यांनी सर्व प्रादेशिक उपसंचालकांना या सुधारित आकृतीबंधानुसार कर्मचाऱ्यांच्या पदस्थापनेची व कार्यालये कार्यान्वित करण्याची कार्यवाही तात्काळ करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे अकोला जिल्ह्यातील प्रलंबित मोजणी प्रकरणे आणि नगर भूमापनाच्या कामाला मोठी गती मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## व्हायरस आल्याने शेतकऱ्यांनी उपटून फेकली मिरची

प्रतिनिधी २६ जून

**बुलढाणा :** तालुक्यातील मासरूळ परिसरात शेतकऱ्यांनी एप्रिल महिन्यात मोठ्या प्रमाणात मिरचीची लागवड केली होती. त्यावर लाखो रुपये खर्च केला होता. मात्र, पावसाळा लांबल्याने उष्णतेने मिरचीवर अनेक प्रकारचे व्हायरस आल्याने शेतकऱ्यांनी मिरची उपटून फेकल्याने त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

उष्णतेमुळे मिरचीच्या झाडांवर कोकडा सारखा रोग येवून फुलकळी विनाच झाडे पोसावी लागली. झाडे डोलदार झाली, मात्र फुलकळी आणि मिरची नाहीशी झाली. मिरचीच्या उत्पादनासाठी लागवड करून खत, औषधी फवारणी तसेच विकतचे पाणी आणून मिरची जोपासली. ३ महिने उन्हा-तान्हात ठिबक, मल्चींग, मिरचीचे रोप, मजुरी, फवारणी व खते असा लाखो रुपये खर्च करून अखेर सर्व प्रयत्न निष्फळ ठरल्याने अखेर शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडली. मासरूळ परिसरातील जवळपास १०० एकरावरील मिरची काढून टाकल्याने लाखोचा खर्च वाया गेल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहे.

# देशमुख महिला मंडळाची मासिक सभा संपन्न

प्रतिनिधी २६ जून

**अकोला :** देशमुख महिला मंडळातील बनारसी ग्रुपच्या वतीने जून महिन्याची मासिक सभा उत्साहात संपन्न झाली. यावेळी वाराणसीच्या संस्कृतीची झलक बनारसी ग्रुपच्या सख्यांनी सादर केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला माजी आमदार प्रा. बी .टी. देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर दीप प्रज्वलन, प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

व्यासपीठावर मंडळाच्या अध्यक्षा राजश्रीताई, ज्येष्ठ सल्लागार कविता ताई, प्रमुख पाहूण्या वंदना युवराज, कोषाध्यक्ष प्रतिभाताई, ग्रुप लीडर विजयाताई यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक कविता ताईंनी केले तर बाल संस्कार शिबिरात राबविलेल्या उपक्रमाविषयीची माहिती ज्योतीताईंनी दिली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय उज्वला यांनी करून दिला. प्रमुख पाहूण्या वंदना ताईंनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षा राजश्रीताईंनी आगामी उपक्रमांबद्दल माहिती सांगीतली, त्याचप्रमाणे मंडळातील सख्यांच्या दहावी व बारावीतील गुणवंत पाल्यांचा कौतुक सोहळा समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी अमेय , धनश्री , रूपम , स्वरा , राघवेंद्र ,




### बनारसी ग्रुप तर्फे पर्यावरण दिन योग दिन साजरा

अवधूत , केतकी , सई , आयुष , हर्षाली ,ऋतुराज,स्वामी इत्यादी विद्यार्थ्यांचा सत्कार घेण्यात आला. तसेच वटसावित्रीच्या सणाचे औचित्य साधून आधुनिक सावित्री सौ अरुणा देशमुख यांच्या त्याग व समर्पणाची दखल घेत बनारसी ग्रुप तर्फे सत्कार करण्यात आला.

'पाऊस धारा' या थीम अंतर्गत उज्वला, वैशाली, शिवानी, संध्या, मंजू, विजया, शुभांगी, दिप्ती, भावना, प्रिया, सिद्धी यांनी बहारदार गाण्यांवर नृत्य सादर केले. यावेळी उपस्थित सख्यांसाठी विविध स्पर्धा व खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ड्रेस कोड च्या विजयी सख्या आहेत अनुराधा, दीप्ती, स्वप्ना, ममता, सारिका, अपेक्षा. तसेच चिठ्ठी गेम मध्ये वसुधा, कल्पना, नीता, सुजाता, सारिका, साधना, नभा, शालिनी, शितल, स्नेहल या विजेता आहेत. तसेच हाऊजी गेमच्या विजेत्या आहेत यक्ष्मा,संगीता, साधना, रेवती, विद्या, मंजू, रेवती, संगीता, उज्वला, अर्चना, अनिता, मंजू, अनिता. मंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या स्त्री रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांसाठी अन्नदानाच्या उपक्रमांतर्गत मदत करणाऱ्या सौ. आशा थोरात यांचा सत्कार मंडळातर्फे घेण्यात आला. तसेच योगादिन नीमीत्त 'करा योग रहा निरोग' या संकल्पनेनुसार ?ड. कांचन शिंदे यांनी मार्गदर्शन केले. सूत्र संचालन डॉ. शिवानी व भावना यांनी केले तसेच बनारसी ग्रुपच्या सदस्याच्या कार्याची ओळख मंजुषा यांनी करून दिली. आभार प्रदर्शन स्मिता यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बनारसी ग्रुपच्या सदस्य कविता ढोरे, संध्या , ज्योती , विजया , मंजुषा , अनघा , शुभांगी मीना, उज्वला , वैशाली , डॉ. शिवानी ,दिप्ती , भावना , प्रिया , संध्या ,स्मिता , सिद्धी यांनी परिश्रम घेतले.

# कॉंग्रेस नेते हिदायतउल्ला पटेल खून प्रकरणात दोन संशयीत आरोपींचा अटकपूर्व जमानत अर्ज न्यायालयाने फेटाळला

प्रतिनिधी २६ जून

**अकोट :** अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. बी.एम. पाटील यांनी कॉंग्रेस नेते हिदायत पटेल हत्या प्रकरणात संशयीत आरोपी पटेल फाजील खाँ आसीफ खाँ व फारुख खाँ आसिफ खाँ पटेल राहणार मोहाळा यांचा अटकपुर्व जमानत अर्ज नामंजूर केला.

या प्रकरणात वरील दोन्ही आरोपींनी अटकपुर्व जमानत मिळण्याकरिता अर्ज दाखल केल्यानंतर सरकारतर्फे सरकारी वकील अजित देशमुख यांनी जमानत अर्जाला विरोध करतांना न्यायालयात युक्तीवाद केला की, सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा आहे असन सदर गन्हा हास्खल आहे त्या तारखेपासुन गुन्हयातील संशयीत अर्जदार दोन्ही आरोपी हे फरार आहेत व त्यांनी आपले मोबाईल बंद करुन ठेवले आहे.

गुन्ह्यातील संशयीत दोन्ही अर्जदार आरोपीनी गुन्हयात अटक असलेला आरोपी उबेद खॉ पटेल राजीक उर्फ कालु खाँ पटेल यास गुन्हा करण्याकरीता कशाप्रकारे व कोणते आमीष देवुन प्रवृत्त केले याबाबत सखोल तपास करायचा आहे. गुन्हा गंभीर स्वरुपाचा असून आरोपीला जामीन मिळाल्यास तो फिर्यादी व साक्षीदार यांच्यावर दबाव किंवा धाकधपट करुन तपासात अडथळा आणु शकतो. वरील सर्व मुद्दे लक्षात घेता संशयीत आरोपीचा जमानत अर्ज नामंजूर करण्यात यावा असा युक्तिवाद सरकारी वकील अजित देशमुख यांनी केला. फिर्यादी तर्फे ॲड. मुन्ना खान व ॲड. श्रीरंग तट्टे यांनी सरकार पक्षाला सहकार्य केले. दोन्ही पक्षाच्या युक्तीवादानंतर कोर्टाने दोन्ही संशयीत आरोपींचा अटकपुर्व जमानत अर्ज २४ जून रोजी नामंजुर केला.

# जिल्हाधिकारी कार्यालयातील मुद्रांक कलेक्टर एसीबीच्या जाळ्यात

प्रतिनिधी २६ जून

**अकोला :** अकोला जिल्हाधिकारी कार्यालयातील मुद्रांक कलेक्टर किरण चौधरी यांना अँटी करप्शन ब्युरो अकोलाच्या पथकाने लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. गुरूवारी सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

अकोला एमआयडीसी मध्ये प्लॉटचे डिव्हायडेशन झाल्यानंतर सदरचा प्लॉट पत्नीच्या नावावर करून देतो यासाठी दहा हजाराची



लाच मुद्रांक कलेक्टर यांनी मागितली होती.

याबाबत फिर्यादीने अँटी करप्शन ब्युरोकडे तक्रार दिल्यानंतर आज मुद्रांक कलेक्टर यांना त्यांच्याच कार्यालयातून अँटी करप्शन ब्युरोने अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे. वरिष्ठ अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकल्याने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात एकच खळबळ उडाली.

## नागरी हक्क संरक्षण पथक अमरावती ग्रामीण एक दिवसीय आयोजीत नागरीक कार्यशाळा

प्रतिनिधी २६ जून

**अमरावती :** नागरी हक्क संरक्षण पथक अमरावती ग्रामीण व बार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ सुधारित नियम २०१५ कायदयांची प्रभावी अंमलबजावणी जनजागृती व गुणवत्तापूर्ण तपास या उद्देशाने एकदिवसीय नागरिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

समाजकल्याण आयुक्त कार्यालय अमरावती येथील सामाजिक न्याय भवन येथे आयोजित या कार्यशाळेला विविध क्षेत्रातील मान्यवर अधिकारी समाजकल्याण विभागाचे अधिकारी विधी तज्ज्ञ, पोलीस पाटील सामाजिक कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.(अश्वती दोर्जे भापोसे अपर पोलीस महासंचालक नागरी हक्क संरक्षण महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या मार्गर्शनामध्ये अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याचे महत्त्व, त्याची प्रभावी अंमलबजावणी पीडितांना मिळणारे संरक्षण व न्यायव्यवस्थेतील विविध तरतुदी याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये निकेतन कदम भा.पो.से पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण, मा. अनिता पाटील म.पो.से. पोलीस अधीक्षक नागरी हक्क संरक्षण अमरावती परिक्षेत्र तसेच मा. दत्ता तोटेवाड म.पो.से. अपर पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण उपस्थित होते. कार्यशाळेत माया पी. केदार प्रादेशिक आयुक्त समाज कल्याण अमरावती, आरव्ही. जाधवर सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अमरावती, अनिता शे. गवई जिल्हा प्रकल्प अधिकारी बार्टी अमरावती तसेच ॲड. डॉ मनीष शिरसाट प्राचार्य तक्षशिला विधी महाविद्यालय तथा अभियोक्ता अमरावती जिल्हा व सत्र न्यायालय यांनी कायद्याच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेद्वारे नागरिकांना अनुसूचित जाती/ जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत उपलब्ध हक्क तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया पीडितांना मिळणारी आर्थिक मदत पुनर्वसन उपाययोजना तसेच न्याय मिळविण्यासाठी आवश्यक कायदेशीर प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. सदर कार्यशाळेला अमरावती ग्रामीण मधून विविध तहसील व गावातील २०० पोलीस पाटील, उपस्थित होते. तसेच बार्टीचे समन्वय असे ३१९ नागरिकांच्या उपस्थितीमध्ये सदर अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची जनजागृती एक दिवस नागरिक कार्यशाळा अतिशय उत्साहात संपन्न झाली.या कार्यक्रमाचे आयोजन नागरी हक्क संरक्षण पथक अमरावती ग्रामीण यांनी केले असून नागरिकांमध्ये, कायद्याविषयी जागरूकता वाढवून सामाजिक समता न्याय व बंधुभाव दृढ करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास आयोजक अनिता पाटील पोलीस अधीक्षक नागरिक हक्क संरक्षण परिक्षेत्र अमरावती यांनी व्यक्त केला.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस निरीक्षक उज्वला वाक्पांजर यांनी केले असून सूत्रसंचालन पोलीस निरीक्षक प्राजक्ता नागापुरे यांनी केले. सुसजय तपास, न्यायाची आस नागरी हक्क संरक्षण हीच आमची बांधिलकी या संदेशासह राष्ट्रगीताचे गायन करून कार्यक्रमाची यशस्वी, सांगता झाली.

# सावरगाव ते वणी-वारुळा रस्ता त्वरित दुरुस्त न झाल्यास तहसील कार्यालयावर महिलांचा मुक्काम



प्रतिनिधी २६ जून

**अकोट :** सावरगाव ते वणी-वारुळा रस्ता काही वर्षांपासून अर्धवट अवस्थेत आहे. रस्त्याच्या कामाचा प्रशासनाकडून मूहुर्तच निघाला नाही. हा रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक अंतर्गत डांबर रस्ता तयार झाला. परंतु काम अर्धवट राहिले. काम त्वरित झाले नाही तर महिला आंदोलन करतील असा इशारा दिला आहे.

सावरगावातील सुरेश नारे यांच्या शेतातून रस्ता होता परंतु नारे यांनी भूमिअभिलेक कार्यालयाकडून मोजणी केली असता नकाशा प्रमाणे हा रस्ता खापरवाडी वरूळ येथील शेतकऱ्यांच्या शेतातून निघाला. मोजणीच्या वेळी या कोणत्याही शेतकऱ्यांनी आक्षेप घेतला नाही असे सांगण्यात येते. शेतकऱ्यांचा आक्षेप नसल्यामुळे दोन दिवस रस्ता सुरळीत होता. मागच्या आठवड्यात तहसीलदार, मंडळ अधिकारी ग्रामसेवक सरपंच ग्रामपंचायत सदस्य व भूमी अभिलेख कार्यालया मार्फत रस्ता मोजून शासनामार्फत रस्ता तयार केला. ज्या शेतकऱ्यांच्या शेतातून रस्ता गेला त्या शेतकऱ्यांनी रस्ता बंद करून, नाली खोदून स्वतः च्या मनाने रस्ता काढून दिला. असे रोज चालू आहे. आज एक शेतकरी तर दुसऱ्या दिवशी दुसरा शेतकरी वाट करतो. त्यामुळे शाळकरी मुले, दुग्ध व्यावसायिक आणि सावरगाव येथील गावकऱ्यांचे जाणे येणे कठीण झाले आहे. तसेच शेतकरी दररोज वाद करत आहेत.

त्यामुळे जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे. रस्त्याची शाहनिशा करून संबधित रस्ता जाणे येणे करीता पक्का तयार करून देण्यात यावा. अन्यथा समस्त सावरगाव गावकरी आपल्या तहसील कार्यालय येथे मुक्काम आंदोलन करू यांची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असा इशारा दिला.

# बाळापुरात मोहरम निमित्त सवारी उत्सव जामोदे परिवाराकडून उत्सवाची परंपरा कायम

**बाळापुर :** शहरात गुरुवार २५ व शुक्रवार २६ जून रोजी मोहरम निमित्त सवारी उत्सव साजरा केला जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून जामोदे परिवाराकडून हा उत्सव साजरा केला जातो.

शहरातील लाल सवारी चौकातील लाल सवारी म्हणून प्रसिद्ध असलेली धोबीची लाल सवारी म्हणून या सवारीची ओळख आहे. स्व. राजाराम जामोदे, बळीराम जामदे, जयराम जामोदे यांचे मामा स्व. अंबुजी मोकळकर यांच्या मांडीवर आपोआप लाल सवारीचे आगमन झाले होते. तेव्हापासून ही लाल सवारी 'धोबी की सवारी' म्हणून ओळखल्या जाते. गेल्या काही वर्षांपासून लाल सवारी म्हणजे मोठी सवारी व छोटी सवारी ही धोबी बांधवांच्या घरांच्या बाजूला बंगल्यामध्ये बसत होती. परंतु काही कारणास्तव सवारी त्या ठिकाणी बसत नसल्यामुळे आता परंपरेनुसार छोटी सवारी जामोदे कुटुंबीयांकडे आहे. जुन्या वारसा प्रमाणे स्व. जयराम जामोदे यांच्या निवासस्थानी त्यांचे सुपुत्र सुरेश उर्फ बंडू जामोदे, स्व. बळीराम जामोदे यांचे सुपुत्र देविदास जामोदे व त्यांची मुले, नातवंडे हा वारसा त्यांच्या



निवासस्थानी परंपरेनुसार चालवत आहेत. सध्या मोहरम सुरू असून जामोदे कुटुंबीयांनी त्यांच्या निवासस्थानी लाल सवारीचे आगमन करून परंपरा जोपासली आहे.

तर या लाल सवारीची पहिल्या पासुन छोटी लाल सवारी उठविणारे सादीका पहेलवान हे सवारी उठुन उत्सव साजरा करत असता.तर या छोटी लाल सवारी बसल्यामुळे या चौकांमध्ये रौनक आली असुन तर दुरुन दुरुन तसेच बाहेरगाव वरुन भक्तगण सवारीचे दर्शन घेण्यासाठी येतात हे विशेष.



# पहिल्याच मुसळधार पावसात अकोटची जलनिस्सारण व्यवस्था कोलमडली

वि. प्रतिनिधी २६ जून

**अकोट :** अकोट शहरात मंगळवारी झालेल्या मुसळधार पावसाने नगर परिषदेच्या जलनिस्सारण व्यवस्थेची पोलखोल केली. पावसाळ्यापूर्वी नालेसफाई मोहीम राबविण्यात आली असली तरी नाल्यांवरील अतिक्रमणे हटविणे आणि संपूर्ण साफसफाई करणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. परिणामी, पहिल्याच जोरदार पावसात शहरातील अनेक भाग जलमय झाले असून काही ठिकाणी पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली.

शहरातील नरसिंग मंदिर रोड, यात्रा चौक, कालंका माता चौक तसेच इतर सखल भागांमध्ये पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचले. नाल्यांमधून पाण्याचा निचरा न झाल्याने रस्त्यांवरून पाणी वाहू लागले. काही भागांतील घरांमध्येही पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. घरगुती साहित्य, धान्य व इतर वस्तूंचे नुकसान झाल्याची माहिती रहिवाशांनी दिली. नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्या, गाळ व इतर कचरा साचल्याने पाणी साचले. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी लाखो रुपये खर्च करून नालेसफाई केल्याचा दावा केला जातो. मात्र प्रत्यक्षात अनेक नाल्यांमध्ये गाळ, कचरा आणि प्लास्टिकचा साठा कायम असल्याने चित्र दिसून आले आहे. पहिल्याच पावसात शहरातील प्रमुख रस्ते आणि चौक जलमय झाल्याने नगर परिषदेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, शिवसेनेचे वैद्यकीय आघाडीचे जिल्हाध्यक्ष रोशन पर्वतकर यांनी परिस्थितीची तक्रार केल्यानंतर मुख्याधिकाऱ्यांनी पूरबाधित भागांची पाहणी केली. गांधी मैदान ते खानापूर वेस दरम्यानच्या मुख्य नाल्यात कचरा अडकून पाणी रस्त्यावर वाहत असल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर संबंधित विभागाला तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. स्थळ पाहणीनंतर शहरातील सर्व लहान-मोठ्या नाल्यांची जेसीबीच्या साहाय्याने सखोल साफसफाई करण्याचे आदेश मुख्याधिकाऱ्यांनी दिले. तसेच पाणी ओसरल्यानंतर बाधित भागांमध्ये जंतुनाशक फवारणी व ब्लिचिंग पावडर टाकण्याचे काम युद्धपातळीवर राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**प्लास्टिक बंदीचा फज्जा?**

राज्यात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी लागू असतानाही अकोट शहरातील नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा कचरा आढळून आला. यामुळे नाल्यांचा प्रवाह अडथळला जाऊन पाणी साचल्याचे चित्र दिसून आले.

# उमरखेडचा आरोपी गजाआड

**यवतमाळ :** शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी उमरखेड पोलिसांनी धडक कारवाई करत वारंवार गुन्हे करून दहशत निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगाराचा नागपूर जेलचा रस्ता दाखवला आहे. रेकॉर्डवरील धोकादायक आरोपी शेख शाहरूख शेख फतरू, वय २८ वर्षे, रा. उमरखेड याच्यावर एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली. पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांनी या आरोपीचा एमपीडीए प्रस्ताव तयार करून



जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडे सादर केला होता. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर जिल्हा दंडाधिकारी यांनी प्रस्तावाला मंजुरी दिली व आरोपीची पुढील एक वर्षासाठी नागपूर मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्याचे आदेश दिले. यावेळी ठाणेदार शंकर पांचाळ यांनी रेकॉर्डवरील गुन्हेगारांना सज्जड इशारा दिला. स्वतःला 'भाई', 'डॉन' समजणाऱ्यांवर एमपीडीए, मकोका व तडीपारीची कारवाई यापुढेही सुरूच राहील.

# कार्यस्थळी महिलांच्या सुरक्षिततेसाठी पॉश कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी होणार – महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

प्रतिनिधी २६ जून

### ♦ महिला व बालविकास आणि कामगार विभाग समन्वयाने करणार काम



**मुंबई :** राज्यातील शासकीय तसेच खासगी आस्थापनांमध्ये महिलांना सुरक्षित, सन्मानजनक आणि लैंगिक छळमुक्त कार्यस्थळ उपलब्ध करून देण्यासाठी 'पॉश' (इध्एए) कायद्याच्या अंमलबजावणीला अधिक बळकटी देण्यात येणार असून, यासाठी महिला व बालविकास विभाग आणि कामगार विभागाने समन्वयाने काम करावे, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. मंत्रालयात आयोजित महिला व बालविकास व कामगार विभागाच्या संयुक्त आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस दोन्ही विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री तटकरे यांनी सांगितले की, कार्यस्थळी महिलांवरील लैंगिक छळ रोखण्यासाठी पॉश कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. काही खासगी आस्थापनांमध्ये या कायद्याची अपेक्षित अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले असून, त्यासाठी अधिक सक्षम उपाययोजना करण्यात येणार आहेत. कामगार, उच्च व तंत्र शिक्षण, शालेय शिक्षण, उद्योग तसेच संबंधित विभागांच्या सहभागातून पॉश कायद्याच्या अधिक प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक उपाययोजनांचा सविस्तर अहवाल तयार करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. बैठकीत अंतर्गत तक्रार समित्यांचे गठन व पुनर्गठन, ऑडिट प्रक्रियेत पॉश कायद्याच्या अंमलबजावणीचा समावेश, तसेच खासगी संस्थांच्या नोंदणी व नूतनीकरण प्रक्रियेत पॉश कायद्याअंतर्गत आवश्यक तरतुदींचा समावेश करण्याबाबत सुरू असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. याशिवाय, शासनाने प्राधिकृत केलेल्या तपासणी अधिकाऱ्यांमार्फत जिल्हानिहाय तपासण्या अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार असून, सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित आणि सन्मानजनक कार्यस्थळ सुनिश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बैठकीत कामगार विभागाने माहिती दिली की, अंतर्गत तक्रार समित्या स्थापन करणे आणि आवश्यकतेनुसार त्यांचे पुनर्गठन करणे, ऑडिट प्रक्रियेत पॉश कायद्याच्या पालनाचा समावेश करणे तसेच खासगी संस्थांच्या नोंदणी व नूतनीकरण प्रक्रियेत अंतर्गत तक्रार समिती स्थापनेची अट समाविष्ट करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. तसेच, ज्या आस्थापनांमध्ये दहा किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, तेथे अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे बंधनकारक असून, या तरतुदीची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही याकडे लक्ष केंद्रीत करावे.

# राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा – आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक वुईके

प्रतिनिधी २६ जून

**मुंबई :** राज्यातील आदिवासी महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण करण्यासाठी 'राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण' योजनेची अंमलबजावणी अत्यंत प्रभावीपणे करून आदिवासी भागात महिला बचत गटांचे जाळे निर्माण करावे, असे निर्देश आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक वुईके यांनी दिले. मंत्रालयात आयोजित आदिवासी विकास विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, सहसचिव मच्छिंद्रनाथ शेळके उपस्थित होते. तर आयुक्त लीना बनसोड आणि अपर आदिवासी आयुक्त यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभाग घेतला. बैठकीत प्रामुख्याने 'राणी दुर्गावती योजने'च्या माध्यमातून महिला बचत गट निर्मिती करण्याची रुपरेषा करण्याबाबत आदिवासी विकास मंत्री प्रा. उईके म्हणाले, या योजनेअंतर्गत स्थापन करण्यात येणारे आदिवासी महिला बचत गट हे 'उमेद' (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) च्या धर्तीवर अत्यंत सुव्यवस्थित आणि कार्यक्षम असावेत. या अभियानाला गती देण्यासाठी आणि स्थापन झालेल्या महिला बचत गटांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी ९ ऑगस्ट २०२६ रोजी प्रकल्प अधिकारी कार्यालय स्तरावर विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. या कार्यक्रमांमध्ये आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेतलेल्या नागरिकांना आणि महिला लाभार्थ्यांना मोठ्या संख्येने सहभागी करून घ्यावे, जेणेकरून योजनांचा प्रचार आणि प्रसार प्रभावीपणे होईल. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूक्ष्म नियोजन प्रकल्प अधिकारी कार्यालयांनी ३० जूनपर्यंत पूर्ण करून त्याचा सविस्तर अहवाल सादर करावा, असे निर्देश आदिवासी विकास मंत्री यांनी दिले. योजनेच्या अंमलबजावणी सोबतच आदिवासी विकास विभागाच्या निधीचा विनियोग योग्य ठिकाणी होणे गरजेचे असल्याचे अधोरेखित करीत आदिवासी विकास मंत्री प्रा. वुईके म्हणाले, विभागांतर्गत मिळणारा निधी हा केवळ आणि केवळ आदिवासी भागातील विकासकामांसाठीच खर्च झाला पाहिजे. या निधीचा कोणत्याही स्तरावर दुरुपयोग होता कामा नये.

# संजय राऊत यांचा संजय दिना पाटलांवर लेटर बॉम्ब, मुंबई पोलिस आयुक्तांकडे केली

प्रतिनिधी २६ जून



**मुंबई :** उद्धव सेनेतून फुटून बाहेर पडलेले आणि शिंदे सेनेत दाखल झालेले खासदार संजय दिना पाटील आणि खासदार संजय राऊत यांच्यात वाद शिगेला पोहचला आहे. ईशान्य मुंबईत ठाकरे सेना आणि शिंदे सेना आमने-सामने आल्या आहेत. राऊत यांच्या भांडूप येथील निवासस्थानी समर्थकही मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. दरम्यान राऊतांनी खासदार संजय दिना पाटील यांच्याविरोधात लेटर बॉम्ब टाकला आहे. त्यांनी थेट मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांना एक पत्र लिहिले आहे.

संजय राऊत यांनी खासदार संजय दिना पाटलांवर एक लेटर बॉम्ब टाकला आहे. मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांना त्यांनी हे पत्र पाठवले आहे. त्यात असे म्हटले आहे की, 'एका गंभीर बाबीकडे मी आपले लक्ष वेधत आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब) पक्षातून फुटलेले सहा खासदार देशभरात घृणेचा विषय ठरले आहेत. या फुटीविरुद्ध महाराष्ट्राच्या अनतेत कमालीचा संताप असून मतदारांची घोर फसवणूक झाल्यामुळे लोक ठिकठिकाणी रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. आंदोलन करणे, लोकप्रतिनिधीस आब विचारणे हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. पण ईशान्य मुंबईतील 'फुटीर खासदार संजय पाटील यांनी आंदोलनकर्त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. पाटील म्हणतात. 'माझ्या नादाला लागू नका. माझ्याविरोधात आंदोलन करण्याआधी जिवाचा विमा काढून घ्या. मी सरळ तुम्हाला स्मशानात पाठवीन, नाहीतर हॉस्पिटलात पाठवीन.' असा उल्लेख राऊत यांनी या पत्रात केली आहे. खासदार संजय राऊत यांनी मुंबई पोलीस आयुक्तांना पाठवलेल्या पत्रात खासदार संजय दिना पाटील यांनी काय धमकी दिली त्याचा उल्लेख केला आहे. 'मी याआधी ५ लोकांना ठार केले आहे. (ठार केलेले हे ५ लोक कोण व संजय पाटील यांनी त्यांना कधी व का ठार केले त्याचा तपास व्हावा. आरोपीने स्वतःच कबुली दिल्याने त्यांच्याविरोधात तत्काळ हत्येचा गुन्हा दाखल व्हावा.) 'माझ्याविरोधात कोणी आंदोलन केले तर त्यांच्यावर बॉम्ब टाकेन. घरात घुसून मारेन.' अशी धमकी संजय दिना पाटील यांनी दिल्याचा दावा खासदार संजय राऊत यांनी या पत्रात केला आहे. या पत्रात संजय राऊत यांनी खासदार पाटील यांच्या घराची झाडाझडती घेण्याची विनंती केली आहे. 'खासदाराकडून बॉम्ब टाकण्याची धमकी चिंताजनक आहे. हे बॉम्ब त्यांनी आपल्या घरात बनवले असतील तर त्यांच्या घराची त्वरित झडती घ्यावी. त्याकामी दहशतवादविरोधी पथकाची मदत घ्यावी. हे बॉम्ब त्यांना कुणा दहशतवादी टोळीकडून मिळाले असतील तर हा राष्ट्रीय सुरक्षेचा गंभीर मुद्दा मानावा लागेल व दहशतवादी, राष्ट्रविरोधी कृत्यांत सहभागी झाल्याबद्दल त्यांना लगेच ळेईं खाली अटक होणे गरजेचे आहे.' अशी मागणी राऊतांनी केली आहे. त्यांची सर्व वक्तव्ये दहशतवाद, गुन्हेगारी कृत्यात सहभागी होण्याचे पुरावे आहेत. त्यांच्या विरोधात त्वरित कारवाई व्हावी, अन्यथा मला जनतेच्या सुरक्षेसाठी न्यायालयात दाद मागावी लागेल. खासदार पाटील यांच्या धमकीमुळे समाजात चिंतेचे वातावरण आहे. या काळात एखाद्या राजकीय कार्यकर्त्यांवर हल्ला झाला अथवा खून झाला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संजय पाटील यांच्यावर राहील, हे मी इथे खास नमूद करतो, असा इशाराही राऊतांनी दिला आहे.

# नागपूर मेट्रो टप्पा–2 विस्तारास व सागरी सेतू–वांद्रे किल्ला कनेक्टरला मान्यता

प्रतिनिधी २६ जून

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समिती बैठक

**मुंबई :** नागपूर मेट्रो रेल टप्पा २ अंतर्गत कन्हान नदी ते कन्हान शहर या दरम्यान विस्तारीत उन्नत मेट्रो मार्गिका उभारण्यास तसेच मुंबईतील स्वातंत्र्यवीर सावरकर सागरी सेतू वांद्रे किल्ल्याशी जोडण्यासाठी कनेक्टर उभारण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात पायाभूत सुविधा समितीची बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. स्वातंत्र्यवीर सावरकर सागरी सेतूपासून वांद्रे किल्ल्यापर्यंत अतिरिक्त जोडरस्ता तयार करण्यात येणार आहे. यासाठी १७२२.४० कोटी रुपयांचा प्रस्ताव पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मांडण्यात आला होता. हा जोडरस्ता सागरी सेतूपासून वांद्रे किल्याजवळ जोडली जाणार असून तो ३.५५ किमी लांबीचा असणार आहे. या कनेक्टरमुळे २० ते ४५ मिनिटांचा प्रवास हा १० मिनिटांपर्यंत येणार आहे. या जोडरस्त्याचे काम महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. नागपूर जिल्ह्यातील कन्हान परिसरातील सार्वजनिक वाहतूक मजबूत करण्यासाठी नागपूर मेट्रो रेल टप्पा-२ अंतर्गत कन्हान नदी ते कन्हान शहर या उन्नत विस्तारीत मेट्रो रेल्वे मार्गिकेस मान्यता देण्यात आली. ही मार्गिका सुमारे १.४० कि.मी. असून त्यावर १ उन्नत स्थानक असणार आहे. एकूण रु. ३१०.३५ कोटी इतक्या प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या या प्रकल्पाची अंमलबजावणी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (महामेट्रो) मार्फत करण्यास मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पास केंद्रशासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

# मुंबईत यंदाच्या पावसाळ्यासाठी 547 पाणी उपसा पंप, तरीही पाणी तुंबले



प्रतिनिधी २६ जून

**मुंबई :** यंदाच्या पावसाळ्यासाठी मुंबईत ५४७ पाणी उपसा पंप बसवण्यात आले असून १५ मेपासूनच हे पंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. मात्र तरीही २४ जूनला पडलेल्या पावसात मुंबईत अनेक ठिकाणी पाणी तुंबल्याचे आढळून आले. गेल्यावर्षीपेक्षा पंपाची संख्याही वाढवण्यात आली आहे. मुंबई महापालिकेने दोन वर्षांसाठी पाणी उपसा पंपाची सेवा भाडेतत्वावर घेतली असून त्याकरीता १३६ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

जून महिन्यात यंदा पावसाने ओढ दिली. मात्र पहिल्याच पावसातही मुंबई शहर पाण्याखाली गेले. मुंबई महापालिकेत सत्तापालट झाल्यानंतरचा हा पहिला पावसाळा असून यंदा पाणी तुंबू नये म्हणून सत्ताधाऱ्यांनी विशेष काळजी घेतली होती. नालेसफाई पूर्ण व्हावी याकरीता दौऱ्यांवर दौरे केले. तसेच पाण्याचा उपसा करण्यासाठी असलेल्या पाणी उपसा पंपांची संख्याही वाढवली. यंदा संपूर्ण मुंबईत ५४७ पंप बसवण्यात आले आहेत. मात्र तरीही सोमवारच्या पावसात मुंबईत अनेक ठिकाणी रस्ते पाण्याखाली गेले. अनेक बैठ्या वसाहतींमध्ये घरात पाणी शिरले. ५४७ पंप बसवण्याच्या प्रस्ताव स्थायी समितीच्या पटलावर मंजूरीसाठी आला होता. मात्र हा प्रस्ताव यावेळी विचारात घेण्यात आला नाही. त्यामुळे खरोखर या पंपांचा फायदा झाला की नाही याबाबतची चर्चा होऊ शकली नाही. मुंबईच्या भौगोलिक रचनेमुळे सखल भागात दरवर्षी पावसाचे पाणी जमा होते व त्याचा निचरा होत नाही. मुंबईला चारही बाजूने समुद्राने वेढलेले असून मुंबईत पावसाचे प्रमाणही मोठे आहे. त्यामुळे पावसाळ्यात पाणी तुंबण्याचा धोका मुंबईला असतो. मात्र पाणी भरण्याची ठिकाणे कमी करण्यासाठी मुंबई महापालिकेने आतापर्यंत ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत कोट्यवधी रुपयांची कामे केली आहेत. तसेच सूक्ष्म नियोजनांतर्गत दरवर्षी विविध ठिकाणच्या पर्जन्यजलवाहिन्यांची क्षमता वाढवण्याचेही काम केले जात आहे. तरीही मुंबईतील पाणी साचण्याची ठिकाणे कमी झालेली नाहीत. यंदा तर पावसाचे पाणी उपसण्यासाठी पालिका प्रशासनाने तब्बल ५४७ पंपांची व्यवस्था केली आहे. गेल्यावर्षी मे महिन्याच्या अखेरीस पाऊस पडू लागला होता. त्यामुळे यंदा सावधगिरीचा उपाय म्हणून हे पंप १५ मे पासूनच कार्यान्वित करण्यात आले आहेत. सखल भागांमध्ये जोरदार पावसाच्यावेळी साचणाऱ्या पाण्याचा जलद निचरा करण्यासाठी महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागामार्फत अहोरात्र (३ सत्र) मनुष्यबळासह ५४७ उदंचन संच कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यात शहर विभागातील १४६, पूर्व उपनगरे विभागातील १७८ आणि पश्चिम उपनगरातील २२३ उदंचन संचांचा समावेश आहे. उदंचन संचांच्या कार्यावर सतत देखरेख ठेवण्यासाठी यावेळी आयओटी ही प्रणाली बसवण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे उदंचन पंपाची कार्यस्थिती, स्थान, सुरू – बंद होण्याची वेळ, कार्यरत कालावधी आणि तांत्रिक माहितीची स्वयंचलित नोंद ठेवली जाणार आहे. ही माहिती केंद्रीकृत डॅशबोर्डवर प्रत्यक्ष वेळेत उपलब्ध होणार आहे. सर्वाधिक पंप कुर्ला – ६४, मालाड – ५३, वांद्रे, सांताक्रूझ पूर्व – ३६, चर्चगेट कुलाबा – ३० या भागात आहे. दरम्यान, गेल्या काही वर्षांपासून मुंबईत ठराविक भागात मुसळधार पाऊस पडतो तर काही भागात अगदी रिपरिप पाऊस पडत असतो. त्यामुळे पंपांचा वापरही काही ठिकाणी खूप होतो तर काही ठिकाणी अजिबात होत नाही. बुधवारी पडलेल्या पावसातही दक्षिण मुंबईतील पंपांचा फारसा वापर झाला नाही. मात्र उपनगरात पंप नऊ दहा तास सुरू होते, अशी माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# महाड मच्छी मार्केट इमारतीसाठी १५ दिवसांत प्रस्ताव सादर करा - मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे

प्रतिनिधी २६ जून

**मुंबई :** प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यातील महाड शहरात मच्छी मार्केट इमारत प्रकल्पाचा परिपूर्ण व सर्वसमावेशक प्रस्ताव तयार करून तो १५ दिवसांच्या आत शासनाकडे सादर करावा, असे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले. प्रस्ताव सादर झाल्यानंतर आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तत्काळ करण्यात येईल, असेही मंत्री नितेश राणे यांनी स्पष्ट केले. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यातील महाड शहरात मच्छिमार्केट उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत मंत्रालयातील दालनात मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत महाड नगरपरिषदेकडून मच्छी मार्केट उभारणीसंदर्भात आतापर्यंत करण्यात आलेल्या कामांचा सविस्तर आढावा मंत्री राणे यांनी घेतला. या प्रकल्पामुळे मत्स्यव्यवसायाशी संबंधित विक्रेते, मच्छी व्यावसायिक तसेच ग्राहकांना आधुनिक आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. बैठकीस आमदार प्रवीण दरेकर, मत्स्यव्यवसाय आयुक्त पी. प्रदीप, महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले तसेच महाड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# मुंबईतील 'या' झोपडपट्ट्यांचा लवकरच होणार कायापालट

प्रतिनिधी २६ जून



**मुंबई :** मुंबईतील तीन मोठ्या झोपडपट्टी भागांचा पुनर्विकास महाराष्ट्र शासनाच्या झोपडपट्टी समूह (क्लस्टर) पुनर्विकास योजनेअंतर्गत लवकरच केला जाण्याची शक्यता आहे. झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने यासंदर्भात जोगेश्वरी पूर्व येथील मजासवाडी, वांद्रे पूर्व येथील बेहरामपाडा आणि वडाळा येथील ट्रक टर्मिनल क्षेत्राच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला आहे.

हा प्रस्तावित प्रकल्प १०१ एकर क्षेत्रफळाच्या जुहू लेन-गिल्बर्ट हिल प्रकल्पांतर शहरातील सर्वात मोठ्या झोपडपट्टी पुनर्विकास योजनांपैकी एक आहे. हे तिन्ही भाग मिळून एकूण ८५० एकरपेक्षा जास्त क्षेत्रावर पसरलेले आहेत. यामध्ये वडाळा येथील अँटॉप हिल या पहिल्या समूहाचा (क्लस्टर) समावेश असून, हे क्षेत्र सुमारे ४५० एकरांवर पसरलेले आहे आणि त्यात ६५,००० झोपड्या आहेत. दुसरा भाग जोगेश्वरी पूर्व येथील माजसवाडीचा आहे, जो सुमारे २६० एकरांवर पसरलेला असून त्यात ५०,००० झोपड्या आहेत.

तिसरा भाग वांद्रे पूर्व येथील बेहरामबागचा असून तो १४० एकरपेक्षा जास्त क्षेत्रावर पसरलेला आहे आणि त्यात जवळपास १२,००० झोपड्या आहेत. असे असले तरी या प्रकल्पांच्या अचूक सीमा आणि त्यात समाविष्ट होणाऱ्या एकूण झोपड्यांची अंतिम संख्या अद्याप निश्चित झालेली नाही. झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने या क्लस्टर पुनर्विकास प्रकल्पांचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या उच्चाधिकार समितीकडे मंजुरीसाठी पाठवले आहेत. आता या प्रस्तावांवर राज्य सरकारच्या समूह पुनर्विकास कार्यक्रमाचा एक भाग म्हणून विचार केला जाईल. महाराष्ट्र सरकारने नोव्हेंबर २०२५ मध्ये या झोपडपट्टी समूह पुनर्विकास योजनेची सुरुवात केली होती.

# शेतकऱ्यांसाठी खुशखबर ! कुटुंबांतील लग्नासाठी आता एसटी मिळणार सवलतीच्या दरात

प्रतिनिधी २६ जून



**मुंबई :** शेतकरी कुटुंबांना लग्नसमारंभासाठी सवलतीच्या दरात एसटी बस उपलब्ध करून दिली जाईल. तसेच अवैध प्रवासी करणाऱ्या वाहनांचे परवाने रद्द करण्यात येईल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी विधान परिषदेत केली.

मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर डहाणू तालुक्यात साखरपुड्यासाठी निघालेल्या वऱ्हाडाच्या ट्रकला झालेल्या अपघाताच्या अनुषंगाने उबाठा गटाचे सदस्य सुनील शिंदे यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते बोलत होते. सरनाईक म्हणाले, शेतकरी कुटुंब लग्न किंवा अन्य शुभकार्यासाठी अनेकदा ट्रक, डंपर किंवा अन्य अवैध वाहनांचा वापर करतात. ही बाब लक्षात घेऊन महामंडळाकडे नवीन बसचा ताफा दाखल झाल्यानंतर शेतकरी कुटुंबात मुलगा किंवा मुलीचे लग्न असेल आणि त्यांनी एसटीकडे बसची मागणी केली, तर एसटी महामंडळ त्यांच्या दारापर्यंत बस पोहोचविण्यासाठी प्रयत्न करेल.

**डेपो विकासातून बेस्टला पुनर्वैभव; जागांची मालकी बेस्टकडेच राहणार**

राज्यात वाढत्या लोकसंख्येमुळे रेल्वे, मेट्रो, एसटी आणि बेस्ट यांसारख्या सार्वजनिक वाहतूक सेवांवर ताण वाढला असून त्याचा फायदा अवैध प्रवासी वाहतूक करणारे घेतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी राज्य शासनाने ८,३०० नवीन एसटी बस खरेदी करण्याचा निर्णय घेतला असून त्या टप्प्याटप्प्याने सेवेत दाखल होत आहेत. काही मार्गांवर प्रत्येक तासाला आणि पुढील दोन-तीन महिन्यांत दर अर्ध्या तासाने एसटी बस सेवा सुरू करण्यात येणार आहे. तसेच अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या सहकार्याने व्यापक सुरक्षा आराखडा तयार करण्यात आला असून प्रत्येक जिल्ह्यातील 'ब्लॅक स्पॉट'ची ओळख करून तेथे आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत. अटल सेतू, समृद्धी महामार्ग आणि मुंबई-पुणे द्रुतगती मार्गासारख्या प्रमुख मार्गांवर आपत्कालीन वैद्यकीय सुविधांनाही बळकटी देण्यात येईल. राज्यात लवकरच 'अॅग्रीगेटर पॉलिसी' जाहीर करण्यात येणार असून छोट्या वाहनांना नियमनबद्ध चौकटीत प्रवासी वाहतुकीची संधी देण्याचा विचार सुरू आहे. रॅपिडो, ओला आणि उबरसारख्या कंपन्यांकडून नियमबाह्य पद्धतीने चालवल्या जाणाऱ्या बाईक टॅक्सी सेवांबाबतही शासन गंभीर असून कायदेशीर चौकट मजबूत केली जाईल, अशी ग्वाही सरनाईक यांनी दिली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135